# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 26/08/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत हनुमान मंदीर जवळ पेठबुधवार काटोल येथे दिनांक 08/08/2021 चे 20:30 वा. चे 12:45 वा. दरम्यान मुकेश रमेश बरासे (मृतक), वय 27 वर्ष, रा. अन्नाभाउ साठे नगर, काटोल याने त्याचे ताब्यातील एमएच– 40/बीएम– 7149 क्रमांकाची मोटरसायकलवर त्याचा मित्र नामे– विरू दमे याला मागे बसवून त्याच्या ताब्यातील मोटरसायकल निष्काळजीपणे चालविल्याने मंदीरा जवळील सिमेंट रोडवरील ब्रेकर वरून त्याची मोटासायकल उसळून त्याचा ताबा सुटल्याने स्लीप होवून मोटरसायकल चालक व त्याचा मित्र मागे बसलेला सिमेंट रोडवर पडून घासत गेले. मोटरसायकल चालक याचे डोक्याला गंभीर मार लागून स्वतःचे मरणास स्वतः कारणीभूत असल्याचे मर्ग चौकशीत निष्पण झाले. तसेच मोटरसायकल मागे बसलेला विरू दमे याला डोक्याला मार लागून त्याचे जखमी होण्यास आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पण झाले.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार जवाहर चव्हाण पोस्टे काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री लभाने 9823833863 हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 7 कि. मी. अंतरावरील पवनी जवळ एन एच 44 हायवे रोडवर येथे दिनांक 22/08/2021 चे 21:30 वा. चे 22:00 वा. दरम्यान एमएच– 40/बिपी– 6472 क्रमांकाची मोटरसायकलचा चालक आरोपी मृतक नामे– राजकुमार हरलाल मरसकोल्हे, वय 22 वर्ष, रा. दुगधामना पोस्टे वाडी जि.नागपुर हा आपले ताब्यातील मोटरसायकल व मागे बसलेला नितेश कुमार रामदयाल राहांगडाले, वय 18 वर्ष, रा. कल्यानपुर त बालाघाट जि शिवनी एमपी यास बसवुन जबलपुर कडुन नागपुर कडे एनएच 44 हायवे रोडने जात होता. त्यादरम्यान मृतक याने आपल्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मौजा पवनी येथे एन एच 44 हायवे रोडच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरला धडक दिली. ते दोघेही मोटरसायकल सहीत खाली पडले. या अपघातात मोटरसायकल चालक राजकुमार मरसकोल्हे याच्या डोक्याला व डाव्या हाताला गंभीर मार लागुन तो बेशुध्द झाला. तसेच मागील बालेला जखमी इसम याच्या डाव्या हाताला व डाव्या मांडीला गंभीर मार लागला व डोक्याला किरकोळ मार लागला. दोघांना उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी मोटरसायकल चालकास तपासुन मृत घोषीत केले व मागे बसलेला इसम याचेवर उपचार सुरू आहे. मोटरसायकल चालकाचे मरणा संबधी कागदपत्र पोस्टे. देवलापारला प्राप्त झाल्याने चौकशी अंमलदार यांचे चौकशी अहवाला वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार गोपिचंद कांबळे पोस्टे देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गोपीचंद कांबळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर